मा.प्रशासक
पुणे महानगरपालिका

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:०३/०७/२०२५

पुणे महानगरपालिका
स्थायी समिती
कार्यपत्रिका क्र.१४

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **शुक्रवार, दि.०४/०७/२०२५ रोजी, दुपारी ०४:०० (चार) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय, चौथा मजला, पुणे महानगरपालिका भवन, शिवाजीनगर, पुणे** येथे भरेल.

मा. प्रशासक, पुणे महानगरपालिका यांचे निर्णयार्थ खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात येत आहेत.

वृत्तांत कायम करणे.

माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र.२६२

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.४, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०३/२०२५ ते दि.३१/०३/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.४/२६४, दि.२६/०६/२०२५ चे पत्र.

सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

विषय क्र.२६३

पुणे महानगरपालिका परिमंडळ क्र.१,२, ३ व मोटार वाहन विभागाकरिता विविध इलेक्ट्रिक लॅडर आवश्यकतेनुसार २ वर्षे कालावधीकरिता भाडेतत्वावर घेणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी मे. श्री यश सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस कॉर्पोरेशन, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२,९४,८४,५३०=२२ (जीएसटी विरहीत) पेक्षा तडजोडीने (+) ९.९० ने जादा) असल्याने त्यांचेकडून र.रु.३,२४,०३,४९८=७१ (अक्षरी तीन कोटी चोवीस लक्ष तीन हजार चारशे अठ्ठ्याण्णव रुपये एकाहत्तर पैसे फक्त) पर्यंत (जीएसटी विरहीत) आवश्यकतेनुसार २ वर्षे कालावधीकरिता भाडेतत्त्वावर घेणेस व त्याकामी त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मोवावि/२६८, दि.२६/०६/२०२५ चे पत्र.

विषय क्र.२६४

पुणे महानगरपालिका परिमंडळ क्र.४, ५ व उद्यान विभागाकरिता विविध इलेक्ट्रिक लॅडर आवश्यकतेनुसार २ वर्षे कालावधीकरिता भाडेतत्वावर घेणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी मे. श्री यश सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस कॉर्पोरेशन, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२,८७,६८,०५६=७० (जीएसटी विरहीत) पेक्षा तडजोडीने (+) ९.९० ने जादा) असल्याने त्यांचेकडून र.रु.३,१६,१६,०९४=३१ (तीन कोटी सोळा लक्ष सोळा हजार चौऱ्याण्णाव रुपये एकतीस पैसे फक्त) पर्यंत (जीएसटी विरहीत) आवश्यकतेनुसार २ वर्षे कालावधीकरिता भाडेतत्त्वावर घेणेस व त्याकामी त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मोवावि/२६९, दि.२६/०६/२०२५ चे पत्र.

विषय क्र.२६५

सांस्कृतिक केंद्र कडील १)यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड, २)लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक, बिबवेवाडी, ३)पं. जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, व राजा रवी वर्मा न्यू आर्ट गलरी, घोले रोड, ४)पं. भीमसेन जोशी कलामंदिर, औंध ५)मा. हिंदुहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे कलादालन , ६)राजीव गांधी ई-लर्निंग स्कूल मधील विजय तेंडुलकर नाट्यगृह, सहकारनगर ७) पंडित भीमसेन जोशी कलादालन, सहकारनगर

एकूण ७ नाट्यगृहांची साफसफाई व स्वच्छता विषयाचे काम १ (एक) वर्ष कालावधीसाठी ४२ सेवक संख्या करीता मे.निलेश दिलीप काळे यांची र.रु.१,२२,१२,०१०/- (अक्षर एक कोटी बावीस लक्ष बारा हजार दहा रुपये फक्त) ची निविदा मान्य करून त्यांच्याकडून कामे करून घेणेस, त्यांना कार्यादेश (work order) देणेस, त्यांचेसोबत करारनामा करणेस मे. शासनाकडून वेळोवेळी किमान वेतन दरात झालेल्या दर वाढीच्या बदलानुसार दरमहाचे बिल त्यांना अदा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/सांस्कृतिक/२७१, दि.३०/०६/२०२५ चे पत्र.

विषय क्र.२६६

नगररोड वडगाव शेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत कल्याणीनगर पंपिंग स्टेशन कडे येणाऱ्या मुख्य मलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. R V CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६,३०,२,९७३/- पेक्षा ४७.१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,३४,२७२=७२ अधिक जीएसटी र.रु.६,००,१६९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.६२,२४५/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३९,९६,६८६=७२ (अक्षरी एकोणचाळीस लक्ष शहाण्णव हजार सहाशे शहाऐंशी रुपये बहात्तर पैसे फक्त) पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/२७२, दि.३०/०६/२०२५ चे पत्र.

विषय क्र.२६७

पुणे शिवाजीनगर अंतिम भू.क्र. ५७६/२, ५७६/३, न. भू. क्र. १२१६/२, १२१६/३ फर्ग्युसन रस्ता मिलेनियम प्लाझा येथील वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणेस निविदा मागविल्या असता निविदेतील सर्वाधिक दर देणारे निविदाधारक मे. पी. बी. पी. एन्टरप्रायजेस, पी.एम.टी. कॉलनी, ब्लॉक नं. ३, रुम नं. ४०, गणपती मंदिरासमोर, स्वारगेट, पुणे-४११०४२ यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रुपये १४,५२,१०८=७० (अक्षरी रक्कम चौदा लक्ष बावन्न हजार एकशे आठ रुपये सत्तर पैसे फक्त) ही मनपा निर्धारित रक्कम रुपये १८,४९,८२०=०० (अक्षरी रक्कम अठरा लाख एकोणपन्नास हजार आठशे वीस रुपये फक्त) पेक्षा रक्कम रुपये ३,९७,७११.३० /- (अक्षरी रक्कम तीन लक्ष सत्यान्नव हजार सातशे अकरा रुपये तीस पैसे फक्त) (२१.५०%) ने कमी असल्याने सदर निविदा स्वीकारून कार्यदिश दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी शर्तीप्रमाणे प्रतिवर्षी मक्ता रक्कमेवर २% आयकर घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/२७३, दि.३०/०६/२०२५ चे पत्र.

विषय क्र.२६८

पुणे शहरातील विविध पुलांची दैनंदिन देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे (भाग १) कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. A.R. CONSTRUCTIONS यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१,४०,४४,१७०/- पेक्षा १६.९६०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,१६,६२,२७८=७७ अधिक जीएसटी र.रु.२०,९९,२१०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१९,३९०/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,३७,८०,८७८=७७ (एक कोटी सदोतीस लक्ष ऐंशी हजार आठशे अठ्ठ्याहत्तर रुपये सत्त्याहत्तर पैसे फक्त) तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/२७४, दि.३०/०६/२०२५ चे पत्र.

विषय क्र.२६९

पुणे शहरातील विविध पुलांवर डांबरीकरणाची कामे करणे (भाग २) कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. DHANRAJ ASPHALT COMPANY यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१,६९,१५,९८७/- पेक्षा २५.२५०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,२६,४४,७००=२८ अधिक जीएसटी र.रु.२२,७६,०४६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.३९,१००/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,४९,५९,८४६=२८ (एक कोटी एकोणपन्नास लक्ष एकोणसाठ हजार आठशे शेहचाळीस रुपये अठ्ठावीस पैसे फक्त) तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (२७-०५-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/२७५, दि.३०/०६/२०२५ चे पत्र.

विषय क्र. २७०

पुणे शहरातील विविध पुलांवर डांबरीकरणाची कामे करणे (भाग १) कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. PAVEWAY CONSTRUCTIONS PVT LTD यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१,६८,४१,१३१/- पेक्षा २४.२५०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,२७,५७,१५६=७३ अधिक जीएसटी र.रु.२२,९६,२८८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.६५,४६५/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,५१,१८,९०९=७३ (एक कोटी एक्कावन्न लक्ष अठरा हजार नऊशे नऊ रुपये त्र्याहत्तर पैसे फक्त) तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (३०-०५-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/२७६, दि.३०/०६/२०२५ चे पत्र.

विषय क्र.२७१

भवानी पेठ कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहिनी/ मलनिःसारण वाहिनी/ गॅस वाहिनी/ वीज वाहिनी/ तसेच केबल खोदाई केलेल्या ठिकाणी रीईनस्टेटमेंट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे (भाग ३) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Malang construction यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६७,७२,३२०/- पेक्षा ५.५५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६३,९६,४५६=२४ अधिक जीएसटी र.रु.११,५१,३६२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.८,६४७/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.७५,५६,४६५=२४ (अक्षरी पंच्याहत्तर लक्ष छप्पन्न हजार चारशे पासष्ट रुपये चोवीस पैसे फक्त) पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (२८-०५-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/२७८, दि.०१/०७/२०२५ चे पत्र.

विषय क्र.२७२

भवानी पेठ कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील रस्त्यांवरील चेंबर्स समपातळीत करणे, RCC चेंबर्स करणे, क्षेत्रीय कार्यालय निहाय मोबाईल मेंटेनन्स युनिटद्वारे देखभाल दुरुस्तीची कामे करणे व तदनुषंगिक इतर कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Malang construction यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४,७४,५५६/- पेक्षा ७.८६% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७८,०८,४५५=९ अधिक जीएसटी र.रु.१४,०५,५२२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.९२,१३,९७७=९ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (२८-०५-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/२७९, दि.०१/०७/२०२५ चे पत्र.

विषय क्र.२७३

पुणे मनपाचे फुटओव्हर ब्रिज, भुयारी मार्ग व वाहनतळ सबवे येथे देखभाल व दुरुस्तीची कामे, सुरक्षा व्यवस्था करणे, तसेच विविध प्रकारची कामे करणे, बीआरटी सुरक्षा व्यवस्था करणे (भाग-१) कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. CHANDRAMUKHI SALES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१,३९,१५,७६१/- पेक्षा २५.०५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,०४,२९,८६२=८७ अधिक जीएसटी र.रु.१८,७७,३७५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१,७१,१८०/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,२४,७८,४१७=८७ (एक कोटी चोवीस लक्ष अठ्ठ्याहत्तर हजार चारशे सतरा रुपये सत्त्याऐंशी पैसे फक्त) तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (२९-०५-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/२८०, दि.०१/०७/२०२५ चे पत्र.

विषय क्र.२७४

पुणे शहरातील विविध पुलांची दैनंदिन देखभाल दुरुस्ती विषय काम करणे (भाग ३) (नगर रोड-वडगाव शेरी, येरवडा-कळस-धानोरी, हडपसर-मुंढवा, ढोले पाटील, भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय) कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. A. R. CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१,४१,६२,५९४/- पेक्षा २२% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,१०,४६,८२३=३२ अधिक जीएसटी र.रु.१९,८८,४२८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१७,२९४/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.२९,७३०/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,३०,८२,२७५=३२ (एक कोटी तीस लक्ष ब्याऐंशी हजार दोनशे पंच्याहत्तर रुपये बत्तीस पैसे फक्त) तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/२८१, दि.०१/०७/२०२५ चे पत्र.

मागील सभेचे विषय

विषय क्र.२७५

मंडई विभाग पुणे महानगरपालिका लोहगाव आठवडे बाजार भाजी मार्केट कोपर आळी परिसर लोहगाव दैनंदिन बाजार फी वसुलीचा मक्ता तीन वर्षे मुदतीकरीता वाटपाबाबत कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SHREE SIDDHI ENTERPRISES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३८,५४,८२०/- पेक्षा १.१८% ने जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,००,३०६=८८ अधिक जीएसटी र.रु.७,०२,०५५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४६,०२,३६१=८८ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मंडई/२४७, दि.१९/०६/२०२५ चे पत्र.

(टीप:- सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.२७/०६/२०२५ च्या सभेत ठरले होते.)

संकीर्ण

विषय क्र.२७६

पुणे शहरातील पूल/उड्डाणपूल/रेल्वे ब्रिज/ फुटओव्हर ब्रिज / भुयारी मार्ग/ कल्व्हर्ट इत्यादींच्या स्ट्रक्चरल ऑडिट, अंदाजपत्रक बनविणे, पर्यवेक्षण, दुरुस्ती आणि पुनर्वसन कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करणेसाठी मे. स्ट्रक्टॉनिक कन्सल्टींग इंजिनीअर्स यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/२८२, दि.०१/०७/२०२५ चे पत्र.

१) पुणे शहरातील पूल/उड्डाणपूल/रेल्वे ब्रिज / फुटओव्हर ब्रिज / भुयारी मार्ग/ कल्व्हर्ट इत्यादींच्या स्ट्रक्चरल ऑडिट, अंदाजपत्रक बनविणे, पर्यवेक्षण, दुरुस्ती आणि पुनर्वसन कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करणेसाठी दुसऱ्या क्रमांकाचे तज्ञ सल्लागार मे. स्ट्रक्टॉनिक कन्सल्टींग इंजिनीअर्स यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस.

२) दुसऱ्या क्रमांकाचे तज्ञ सल्लागार मे. स्ट्रक्टॉनिक कन्सल्टींग इंजिनीअर्स यांचेकडून सर्वात कमी (L1) ने भरलेला दर र.रु. १,१८,०९,०००/- इतके दरामध्ये काम करून घेणेस व त्यांचे समवेत करारनामा करणेस.

विषय क्र.२७७

पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण घेत असणाऱ्या इ.९वी आणि इ.१०वीच्या विद्यार्थ्यांना मराठी, उर्दू व इंग्रजी माध्यमाची व पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील रात्रशाळेतीलशिक्षण घेणाऱ्या इ.९ वी आणि इ.१० वी च्या विद्यार्थ्यांना मराठी माध्यमाची क्रमिक पुस्तके देण्यास खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माध्यमिक व तांत्रिक/२८३, दि.०२/०७/२०२५ चे पत्र.

१. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक इ. ९ वी व इ. १० वी शाळां करीता ९८६३४ व रात्रप्रशाले करीता २६०० असे एकूण ०१,०१,२३४ इतकी क्रमिक पुस्तके एकमेव शासकीय उत्पादित संस्था असलेल्या मा. भांडार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ बालभारती सेनापती बापट मार्ग, पुणे यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील शेड्युल चाप्टर ५ अन्वये २ (२) खरेदी करणेस.

२. त्यासाठी येणाऱ्या र.रु.६९,६५,९५४/- (अक्षरी रुपये एकोणसतर लाख पासष्ठ हजार नऊशे चोपन्न फक्त) खर्चाची रक्कम मा. संचालक पाठ्यपुस्तके मंडळ बैंक ऑफ महाराष्ट्र खाते ६०४६५७८९७३५ आयएफएससी (IFSC) कोड MAHB0001261 नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा आरटीजीएसने (RTGS) जमा करणेस

३. विद्यार्थी संख्येत काही प्रमाणात वाढ झाल्यास बालभारती कडून पुनश्चः क्रमिक पुस्तके उपरोक्त दरामध्ये व कार्यपद्धतीनुसार खरेदी करणेस.

४. सदर रक्कम समाज विकास विभागाकडील FE14B135 पुणे मनपा संचलित रात्र शाळेतील इ.९वी ते इ.१०वी मध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्षी क्रमिक पुस्तके व इ.१०वी मध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्षी 21 अपेक्षित संच खरेदी करणे. यामध्ये क्रमिक पाठ्य पुस्तके रक्कम रुपये ६७,९१,५३४/- खर्ची टाकणेस.

५. शाळा चालू होण्याचा कालावधी व पुस्तकांची तातडीची आवश्यकता लक्षात घेता वित्त समितीची मान्यता मिळेल या भरवशावर विद्यार्थ्यांची पुस्तके खरेदी करणेस.

विषय क्र.२७८

गणेशोत्सव काळात करण्यात येणाऱ्या जादा कामाचे मुशहिऱ्या रकमेत खालील प्रमाणे वाढ करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/२८४, दि.०२/०७/२०२५ चे पत्र.

अ.क्र.	हुद्दा	पूर्वी अदा करण्यात येणारी रक्कम दरदिवशी	सध्या प्रस्तावित करण्यात येणाऱ्या दर दिवसाचा
१	विद्युत पर्यवेक्षक, विद्युत पर्यवेक्षक, इलेक्ट्रीशियन, असि. इलेक्ट्रीशियन, आरोग्य (आरोग्य विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग व विविध क्षेत्रिय कार्यालय) खात्याकडील उप प्रमुख आरोग्य निरीक्षक, विभागीय आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक.	र.रु.१५००/-	र.रु.३०००/-
२	बत्ती इन्स्पेक्टर व मोटार सारथी, आरोग्य (आरोग्य विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग व विविध क्षेत्रिय कार्यालय) खात्याकडील मोकादम.	र.रु.१३५०/-	र.रु.२७००/-
३	बात्तीवाला व बिगारी, आरोग्य (आरोग्य विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग व विविध क्षेत्रीय कार्यालय) खात्याकडील बिगारी.	र.रु.१२००/-	र.रु.२४००/-

विषय क्र.२७९

मलनिःसारण देखभाल व दुरुस्ती विभाग अंतर्गत र.रु.५० लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मलनि/२८५, दि.०२/०७/२०२५ चे पत्र.

अर्थशीर्षक	कमी	अधिक
मलनिःसारण देखभाल व दुरुस्ती विभाग ZE16B102/D2-1074 मास्टर प्लान नुसार भैरोबा सिव्हेज डीस्ट्रीक (SD-3) अंतर्गत भवानीपेठ क्षेत्रीय कार्यालय हद्दीमधील नाल्यातील मुख्य मलवाहिन्या स्थलांतरित करून रस्त्यावरून विकसित करणे.	**५० लक्ष**	**---**
नवीन सुचविलेले काम:-		
मलनिःसारण देखभाल व दुरुस्ती विभाग रविवारपेठ, शनिवारपेठ, गणेशपेठ, कसबापेठ, बुधवारपेठ, गुरूवारपेठ, घोरपडीपेठ, गंजपेठ, लोहियानगर, शुक्रवारपेठ, नारायणपेठ सदाशिवपेठ, नवीपेठ, दत्तवाडी, दांडेकर पुल, राजेंद्रनगर, भवानीपेठ, नानापेठ विविध ठिकाणच्या परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे.	**---**	**५० लक्ष**

विषय क्र.२८०

बिंदू माधव बाळासाहेब ठाकरे चौक येरवडा येथे उड्डाणपूल /ग्रेड सेपरेटर करणे या कामाच्या अनुषंगाने खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/२८८, दि.०२/०७/२०२५ चे पत्र.

१) बिंदू माधव बाळासाहेब ठाकरे चौक येरवडा येथे उड्डाणपूल /ग्रेड सेपरेटर करणे या कामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ (ब) प्रमाणे र. रु.११५,७३,३८,७१६=००(एकशे पंधरा कोटी त्र्याहत्तर लक्ष अडोतीस हजार सातशे सोळा रुपये फक्त) (जी.एस.टी., रॉयल्टी, मटेरीयल टेस्टिंग सह) इतक्या रक्कमेचे दायित्व पत्करणेस

२) सदर कामासाठी सन २०२६-२७ व २०२७-२८ या आर्थिक वर्षात टप्प्याटप्प्याने तरतूद उपलब्ध करणेस

विषय क्र.२८१

पुणे महानगरपालिका परिमंडळ क्र. १,२,३ व मोटार वाहन विभागाकरीता विविध इलेक्ट्रिक लॅडर मे. श्री यश सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस कॉर्पोरेशन, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडर दराने (तडजोडीने) (टेंडर र.रु. २,९४,८४,५३०=२२ पेक्षा (+) ९.९९% ने जादा) असल्याने त्यांचेकडून एकूण रक्कम रु. ३,२४,०३,४९८=७१ (जीएसटी विरहीत) पर्यंत आवश्यकतेनुसार २ वर्षे कालावधीकरीता भाडेतत्वावर घेणेकामी सदर निविदेचा कालावधी २ वर्षांचा असल्यामुळे चालू आर्थिक वर्ष संपल्यानंतर या करीता मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद तक्त्याप्रमाणे आवश्यक र.रु.२,४५,००,२०५=९८ (अक्षरी र.रु. दोन कोटी पंचेचाळीस लाख दोनशे पाच रुपये पैसे अठ्ठ्याऩ्नव फक्त) (जीएसटी विरहीत) प्रमाणे होणाऱ्या रक्कमेपर्यंत खर्चाचे दायित्व पत्करावे लागणार असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ मधील ब नुसार सन २०२५-२६ हे आर्थिक वर्ष संपल्यानंतर देखील खर्च होणार असल्याने अशा खर्चाचे

दायित्व पत्करणेपूर्वी मा. मुख्य सभेची मंजुरी आवश्यक असल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ ब नुसार मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मोवावि/२८९, दि.०२/०७/२०२५ चे पत्र.

विषय क्र.२८२

पुणे महानगरपालिका परिमंडळ क्र.४,५ व उद्यान विभागाकरीता विविध इलेक्ट्रिक लॅडर मे. श्री यश सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस कॉर्पोरेशन, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडर दराने (तडजोडीने) (टेंडर र.रु. २,८७,६८,०५६.७० पेक्षा (+) ९.९०% ने जादा) असल्याने त्यांचेकडून एकूण रक्कम रु. ३,१६,१६,०९४=३१ (जीएसटी विरहीत) पर्यंत आवश्यकतेनुसार २ वर्षे कालावधीकरीता भाडेतत्वावर घेणेकामी सदर निविदेचा कालावधी २ वर्षांचा असल्यामुळे चालू आर्थिक वर्ष संपल्यानंतर या करीता मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद तक्त्याप्रमाणे आवश्यक र.रु. २,३९,०४,८५१=७९ (अक्षरी र.रु. दोन कोटी एकोणचाळीस लाख चार हजार आठशे एक्कावन्न रुपये पैसे एकोणऐंशी फक्त) (जीएसटी विरहीत) प्रमाणे होणाऱ्या रक्कमेपर्यंत खर्चाचे दायित्व पत्करावे लागणार असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ मधील ब नुसार सन २०२५-२६ हे आर्थिक वर्ष संपल्यानंतर देखील खर्च होणार असल्याने अशा खर्चाचे दायित्व पत्करणेपूर्वी मा. मुख्य सभेची मंजुरी आवश्यक असल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ ब नुसार मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मोवावि/२९१, दि.०२/०७/२०२५ चे पत्र.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका